# द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A)

## CBCS - अभ्यासक्रम - 2020 - 2021

Semester - III / सत्र - तिसरे

विषय - महाराष्ट्राचा भूगोल - I

स्पेशल पेपर - I (S I) - Gg - 220 (A)

| Sr. NO (1) | Topic (2) | Sub Topic (3) |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग<br>Administrative set up of Maharashtra | 1.1 - ऐतिहासिक आणि राजकीय पार्श्वभूमी<br>1.2 - राज्याचे भौगोलिक स्थान<br>1.3 - शेजारील राज्ये<br>1.4 - प्रशासकीय विभाग |
| 2) | प्राकृतिक जडणघडण / मांडणी<br>physical setting | 2.1 - महाराष्ट्राची भूगर्भीय रचना<br>2.2 - प्राकृतिक रचना (पर्वत, पठार, मैदान)<br>2.3 - नदी प्रणाली (पूर्व व पश्चिम वाहिनी नद्या)<br>2.4 - प्रमुख मृदा प्रकार आणि त्यांचे वितरण |
| 3) | हवामान (climate) | 3.1 महाराष्ट्राचे हवामान विभाग<br>3.2 - पर्जन्याचे वितरण<br>3.3 - दुष्काळग्रस्त क्षेत्रे - समस्या आणि व्यवस्थापन.<br>3.4) - पूर क्षेत्रे - समस्या आणि व्यवस्थापन |

| Sr. No ① | Topic ② | Sub-Topic ③ |
|---|---|---|
| ४) | साधन संपदा<br>Resources | ४.१ - जलसंपदा<br>४.२ - जंगल संपदा<br>४.३ खनिजे आणि ऊर्जासाधने (जलविद्युत ऊर्जा, अणुविद्युत औष्णिक ऊर्जा) |

पुस्तके - 1) महाराष्ट्राचा भूगोल - प्रा. डॉ. संजय पगार
प्रा. डॉ. सुनील ठाकरे
प्रा. सुदाम शिंदे
प्रा. निखिल आगळे

२) महाराष्ट्राचा भूगोल - प्रा. ए. बी. सवदी

3) महाराष्ट्राचा भूगोल. प्रा. टी. पी. पाटील.

# महाराष्ट्राचा भूगोल

## टॉपिक नं - 1

## महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग

## Administrative set up of Maharashtra

### 1.1 - ऐतिहासिक आणि राजकीय पार्श्वभूमी :-

महाराष्ट्र हे दक्षिण व उत्तर भारतास जोडणारे प्रमुख व मोठे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याचा क्षेत्रफळाबाबत देशात 3 रा क्रमांक लागतो.

ऐतिहासिक काळात महाराष्ट्रात सातवाहन राज्यांनी इ. स. पूर्व 235 ते इ. स. 225 पर्यंत म्हणजे सुमारे 450 वर्षे राज्य केले. त्या काळात जुन्नर व पैठण इ. सातवाहनांची जुनी ठाणी होय. त्यावेळी पैठण हे राजधानीचे ठिकाण होते. चंद्रवंशी यादव कुळातील राजा सिमुक सातवाहन घराण्याचा संस्थापक मानला जातो. सातवाहन घराण्याच्या 30 वेगवेगळ्या राज्यांनी महाराष्ट्रात राज्य केले. त्यांच्या काळात महाराष्ट्रातील राजवट वैभवशाली व संपन्न राहिली. वेरूळ, अजिंठा, नाशिक, येथील लेण्या त्यांनी निर्माण केल्या. पूर्व महाराष्ट्र व कोकणास जोडणारा मुख्य रस्ता म्हणजे नाणे घाट इ. स. पूर्व पहिल्या शतकात त्यांनी तयार केला.

सातवाहनांनंतर महाराष्ट्रात वाकाटक (नंदिवर्धन) इ. स. 250 ते इ. स. 525, राष्ट्रकूट (मान्यखेट) इ. स 753 ते इ. स 982,

चालुक्य (बदामी) }
चालुक्य (कल्याण) } इ. स. 973 ते इ. स 1200,

राज्य कोणी. या नंतर

देवगिरीच्या यादवांनी साम्राज्य सुमारे 11 शतक केले. यादवांच्या साम्राज्याचा काळ इ.स. 850 ते इ.स. 1334 असा सांगितला जातो.

देवगिरीचा प्रसिद्ध किल्ला यादवांची निशाणी.

1326 साली यादवांचा पराभव करून अल्लाउद्दीन खिलजीने मुस्लिम सत्ता प्रस्थापित केली. यानंतर बहामनी राज्य निर्माण झाले. आजच्या कर्नाटकातील गुलबर्गा व बिदर हि बहामनी राज्याची प्रमुख ठाणी होती. पुढे 1518 मध्ये बहामनी राज्याचे 5 तुकडे पडले.

1) अहमदनगरची - निजामशाही
2) विजापूरची - आदिलशाही
3) गोवळकोंड्याची - कुतूबशाही
4) वऱ्हाडातील - इमादशाही
5) बिदर येथील - बरीदशाही

त्याच काळात मावळ भागात मराठा समाज एकवटून शिवशाहीचा उदय झाला. शिवाजी महाराजांनी उत्तम संघटन चातुर्याने विजापूरच्या आदिलशाही व दिल्लीच्या मुघलांशी कडवी झुंज देऊन पश्चिम महाराष्ट्रात मराठा राज्य निर्माण केले. पुढे 1674 मध्ये रायगडावर राज्याभिषेक करून छत्रपती हि पदवी धारण केली. यानंतर मराठी राज्यात दुफळी निर्माण होऊन, महाराष्ट्रात पेशव्यांनी मराठा राज्य चालविले. त्यानंतर 1818 साली मराठी पेशवाई नामशेष होऊन इंग्रजी सत्ता अस्तित्वात आली. 1947 साली

इंग्रज सत्तेचा अंत होऊन देश स्वातंत्र्य आला. त्यावेळी महाराष्ट्रात अनेक लहान मोठी संस्थाने होती.

राजकीय पार्श्वभूमीचा आढावा घेत असताना असे समजते की ब्रिटीश राजवटीत मुंबई इलाखा सिंध, गुजरात, पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटकातील विजापूर, धारवाड, बेळगाव व कारवार जिल्ह्यापर्यंत दक्षिणोत्तर होता. तर सध्याचे विदर्भातील नऊ जिल्हे मध्य प्रांतास जोडले गेले होते. सध्याचे मराठवाड्यातील 7 जिल्हे निजामाच्या राज्यात होते. 1948 साली वल्लभभाई पटेल यांनी सैनिक कारवाई करून मराठवाड्यातील 7 जिल्हे महाराष्ट्रास जोडले. त्याच वेळी संसदेत एकमुखाने ठराव करून सर्व लहान मोठी संस्थाने विलीन करून ती महाराष्ट्रास जोडली. 1956 साली मध्यप्रदेशातील मराठी भाषिक विदर्भ महाराष्ट्रास जोडला गेला. त्याचवेळी गुजरातही महाराष्ट्रास जोडले गेल्याने मराठी-गुजराती असे द्विभाषिक राज्य अस्तित्वात आले त्यानंतर पुढे 1 मे 1960 रोजी गुजरात राज्य स्वतंत्र होऊन मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्यावेळी कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ असे भौगोलिक विभाग एकत्रित मिळून मराठी भाषिकांच्या महाराष्ट्राची स्थापना करण्यात आली.

1.2) राज्याचे भौगोलिक स्थान-

भारतातील 28 घटक राज्यांपैकी 'महाराष्ट्र राज्य' हे एक राज्य आहे. भारत देशाच्या मध्यवर्ती भागात महाराष्ट्र राज्य असून उत्तर भारत व दक्षिण भारतास एकत्र जोडणारी विशाल भूमि आहे.

महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार 15° 44' उत्तर अक्षवृत्त ते 22° 6' उत्तर अक्षवृत्त असून रेखांश विस्तार 72° 36' पूर्व रेखावृत्त ते 80° 54' पूर्व रेखावृत्त आहे.

अक्षांश- 15° 44' उ. अक्षवृत्त ते 22° 6' उ. अक्षवृत्त.

रेखांश- 72° 36' पू. रे. ते 80° 54' पू. रेखावृत्त

महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार त्रिकोणाकृती असून दक्षिणेकडे चिंचोळा तर उत्तरेकडे रुंद होत गेला आहे. महाराष्ट्राची पूर्व-पश्चिम लांबी 800 कि.मी असून दक्षिणोत्तर रुंदी सुमारे 720 कि.मी आहे. राज्याचे एकूण क्षेत्रफळ- 307762 चौ कि.मी आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतामध्ये

महाराष्ट्राच्या नैसर्गिक सिमांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की राज्याच्या वायव्य भागात सातमाळ डोंगर रांगा, गाळणा टेकड्या, व सातपुडा पर्वत रांगेतील अक्राणी टेकड्या, उत्तरेस सातपुडा पर्वत रांग व त्याच्या पूर्वेस गाविलगड टेकड्या, आहेत. राज्याच्या ईशान्य दिशेस दरकेसा टेकड्या, पूर्वेस चिरोली टेकड्या, व भामरागड डोंगर अशा नैसर्गिक सिमा आहेत.

महाराष्ट्राच्या दक्षिणेस पठारावर हिरण्यकेशी नदी व कोकणात तेरेखोल नदी तर पश्चिमेस अरबी समुद्र अशा सर्व बाजूंनी नैसर्गिक सिमा आहेत.

1.3) शेजारील राज्य -

अ) महाराष्ट्राच्या उत्तर दिशेला मध्यप्रदेश हे राज्य असून राज्यातील नंदूरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा अमरावती, नागपूर भंडारा, गोंदिया जिल्ह्याच्या सरहद्दी मध्यप्रदेशास भिडतात.

ब) महाराष्ट्राच्या पुर्व दिशेला छत्तीसगड राज्य असून महाराष्ट्रातील गोंदिया, गडचिरोली जिल्ह्याच्या सरहद्दी छत्तीसगड राज्यास भिडतात

क) महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेला तेलंगणा राज्य असून गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ नांदेड जिल्ह्याच्या सरहद्दी त्यास भिडतात

ड) महाराष्ट्राच्या दक्षिणेस कर्नाटक राज्य असून लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर जिल्ह्याच्या सिमा त्यास भिडतात.

इ) महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीच्या दक्षिण टोकास गोवा हे राज्य असून सिंधुदुर्ग जिल्ह्याची सिमा त्यास भिडते.

३) महाराष्ट्राच्या वायव्य दिशेला गुजरात राज्य असून पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार जिल्ह्याच्या सिमा त्यास मिळतात.

1.4) - प्रशासकीय विभाग.

| क्र | विभाग | जिल्ह्याचिसंख्या | जिल्हे |
|---|---|---|---|
| 1) | कोकण | 7 | मुंबई शहर, 2) मुंबई उपनगर 3) ठाणे 4) पालघर 5) रायगड 6) रत्नागिरी 7) सिंधुदुर्ग. |
| 2) | पुणे | 5 | 1) पुणे 2) सातारा 3) सांगली 4) कोल्हापूर 5) सोलापूर. |
| 3) | नाशिक | 5 | 1) नाशिक 2) अहमदनगर 3) धुळे 4) जळगाव 5) नंदुरबार |
| 4) | औरंगाबाद | 8 | 1) औरंगाबाद 2) जालना 3) बीड 4) लातूर 5) नांदेड 6) परभणी 7) उस्मानाबाद 8) हिंगोली |
| 5) | अमरावती | 5 | अमरावती 2) बुलढाणा, 3) वाशीम 4) अकोला 5) यवतमाळ. |
| 6) | नागपूर | 6 | 1) नागपूर 2) वर्धा 3) भंडारा 4) गोंदीया 5) चंद्रपूर 6) गडचिरोली. |


MAHARASHTRA
DIVISION/REGIONS MAP
MADHYA PRADESH
GUJARAT
Gulf of Khambhat
DAMAN & DIU
DADRA & NAGAR HAVELI
CHHATTISGARH
TELANGANA
KARNATAKA
ANDHRA PRADESH
ARABIAN SEA
N
NASHIK DIVISION
NANDURBAR
DHULE
JALGAON
NASHIK
AHMEDNAGAR
AMRAVATI DIVISION
AMRAVATI
AKOLA
BULDHANA
WASHIM
YAVATMAL
NAGPUR DIVISION
NAGPUR
GONDIA
BHANDARA
WARDHA
CHANDRAPUR
GADCHIROLI
AURANGABAD DIVISION
AURANGABAD
JALNA
HINGOLI
PARBHANI
BEED
NANDED
OSMANABAD
LATUR
PUNE DIVISON
PUNE
SOLAPUR
SATARA
SANGLI
KOLHAPUR
KONKAN DIVISION
PALGHAR
THANE
MUMBAI SUBURBAN
Mumbai
MUMBAI
RAIGAD
RATNAGIRI
SINDHUDURG
Map not to Scale
LEGEND
State Boundary
District Boundary
Region/Division Boundary
State Capital